# ‘वज्र ओळी’ आणि ‘अमर ओळी’ : योग-परंपरा

‘वज्रओळी’ आणि ‘अमरओळी’ यांचे उल्लेख ‘लीळा चरित्रात’ आलेले आहेत.[१] या दोन्ही शब्दांचा अर्थ वि. भि. कोलते यांनी ‘योगातील एक सिद्धी’ असा दिलेला आहे.[२] हा अर्थ बरोबर आहे काय? ‘ओळ’ म्हणजे ‘रांग, मालिका, पंक्ती;’[३] ‘A row, a line, a rank.’[४] ‘ओळीचे अभंग’ या सारखा शब्दप्रयोगही ‘वोळी’। ‘ओळी’ मधील अर्थ स्पष्ट करायला साहाय्यक ठरू शकेल.

‘अदंडीनाथ सामर्थ्यकथन’ या लीळेत चक्रधरांनी आपल्या शिष्यांना अदंडीनाथ या नाथपंथातील महात्म्याची कथा सांगितली आहे. त्या महात्म्याची आणि गोरखनाथांची झालेली भेट आणि त्यांनी घेतलेली परस्परांची परीक्षा मुळातून पाहण्यासारखी आहे. :

‘तंव वाटेसि गोरक्ष भेटले : तंव गोरक्षेन पुसिलें : ‘काहांथी आव्यो? काहां-जाव्यो?’ तंव तेणें म्हणीतले : ‘डाकामु भेदीया : अब सोरटी सोमनाथू भेदन जाओं :’ तंव गोरक्षीं म्हणीतले : ‘आपुनाही भेदिया : मग परू काइ भेदैल?’ अदंडिनाथें म्हणीतलें : ‘आपु नाहीं भेदिला : ऐसें कैसेनि जाणिजे?’ तंव गोरखीं म्हणीतलें : ‘देहावरि खर्ग घालिजे आणि पाणीयांतौनि नीगोनि जाए ऐसें जाए : दोनीं धडे तैसींचि : यातें आपुभेदीया ऐसें म्हणिजे :’ मग अदंडिनाथें म्हणीतलें : ‘हो : कां :’ मग गोरखीन स्वर्गुनि खर्ग इंद्राचे अव्हाणिलें : ते खळखळीत : धग-धगीत ऐसें आलें : गोरखीं हातीं घेतलें : अदंडीते पुसिलें : ‘हाणसी कीं हाणों?’ तो उगाचि : मग गोरखीं म्हणीतलें : ‘घे खांडें : मग अदंडिनाथें खांडें खेतलें : गोरखीवरि घातलें : ते पाणीयां आंतौनि वाहुनि जाए तैसें गेले : दोन्ही धडें तैसींचि

मागौती मीळालीं : गोरखीं म्हणीतलें : ‘ पुता : देह जालें : तें ऐसें जाणिजे : ’ मग अदंडिनाथें म्हणीतलें : ‘ आतां तुम्ही घेया : ’ मग गोरखीं खांडें घेतलें : अदंडिनाथावरि घातलें : तवं पाखाणी खांडे लागे ऐसे लागे : तीडकीया उसळलीया : परि खांडें भेदे ना : मग गोरखीं म्हणीतलें: पिंडु काचा : घणाचा घाइं चुरू होईल:’ देह करि जाए : तो वज्रओळिचा : गोरखि अमरओळिचा : ’ ५.

अदंडीनाथ आणि गोरक्षनाथ यांच्यातील उपर्युक्त कथेसारखाच / संवादासारखा भाग म्हणजे प्रभुदेव आणि गोरक्षनाथ यांची भेट. यांच्या भेटीकडे पंडित आवळीकर यांनी ‘ विवेकचिंतामणी ’च्या आपल्या प्रस्तावनेत अभ्यासकांचे लक्ष वेधले होते आणि ‘ प्रभुलिंगलीले ’चाही संदर्भ दिलेला होता : “ ‘ प्रभुलिंगलीले’ मध्ये अल्लमप्रभू व गोरक्ष यांच्या भेटीचे वर्णन आहे व शेवटी गोरक्षांना शिवदीक्षा दिलेल्याचे सांगितले आहे.” ६

या संदर्भानंतर एक तप उलटल्यावर रा. चिं. ढेरे यांनी ‘ अल्लमप्रभू आणि गोरक्षनाथ ’ या प्रकरणात अल्लमप्रभू–गोरक्षनाथातील वज्रकार्यसिद्धी विषयक सप्रयोग चर्चा कथन केली आहे आणि त्या कथनापूर्वी नुसते सांगितले आहे : “ गोरक्षनाथ आणि अल्लमप्रभू यांचा संवाद आणि गोरक्षनाथांची अनुकूल प्रतिक्रिया अल्लमप्रभूंच्या ‘ शून्यसंपादने ’ या कानडी ग्रंथात संकलित झालेली आहे.” ७

‘ शून्यसंपादने ’ हे अनेकांच्या वचनांचे संकलन (संपादनही ) आहे : एकट्या प्रभुदेवांचा तो ग्रंथ नव्हे. ही माहितीची चूक आहे तर वरील विधानापाठोपाठ ढेरे यांनी केलेले विधान त्यातील अलंकारिकतेने सत्याला झाकोळून टाकणारे आहे : “ अल्लमप्रभू अथवा प्रभुदेव हे कर्नाटकाचे ज्ञानेश्वर होत; तर बसवेश्वर हे नामदेव होत.” ८

प्रभुदेव–गोरक्ष आणि अदंडीनाथ–गोरक्ष यांच्या कथांतील / संवादांतील साम्य कोलते–ढेरे यांनी अगर अन्य कोणी यापूर्वी नोंदलेले नाही : ते येथे प्रथमच नोंदवले जात आहे.

हे नोंदवून, संस्कृत– ‘ प्रभुलिंगलीले ’ ९ आणि मराठी ‘ लीला विश्वंभर ’ १० या ग्रंथांतील संबद्ध उताऱ्यांऐवजी ‘ शून्यसंपादने ’मधील निर्देश पाहू आणि ते अदंडीनाथ–गोरक्ष कथेशी तुलून पाहू.

‘ शून्यसंपादने ’च्या अखेरच्या म्हणजे एकविसाव्या ‘ उपदेशात ’त प्रारंभीच संकलनकार सांगतात :

“ गोरक्षगे निजपदमं
ओरंतिरदित्तु प्रभुवु निर्वयलागलु
भूरि महाशरणरुगळु
धारुणियोळगिरदे ऐक्यवडेदुद पेळ्वें.’ ११

अनुवाद असा :

"गोरक्षाला निजपद—
देऊन प्रभू 'शून्य' झाले
अनेक महाशरण
धरणीला कंटाळून 'ऐक्य' मिळवते झाले ते सांगेन.[१२]

प्रभुदेव बसवराज देवादिक असंख्य शिवशरणांचा निरोप घेऊन, कल्याण सोडून श्रीपर्वताकडे निघाले. मुळातील त्या घटनेचे निवेदन असे आहे :

'इंतु प्रभुदेवरु बसवराजदेवरु मोदलाद असंख्यातरेल्लरिगे निजसमाधिय हरिव निरूपिसि बीळकोंडु, कल्याणमं पोरमट्टु, श्रीपर्वतक्के बिजयंगैवुत्तिरलल्लि गोरक्षनेंब सिद्धनं कंडु संभाषणेयं माडि, आतन वज्रदेहमं असिताळपत्रदिं होयिदु नोडि परीक्षेयं कंडु नुडिव प्रस्तावद वचन"[१३] या निवेदनाचे मराठी रूपांतर असे:

"प्रभुदेवांनी, बसवराजदेव आदी असंख्यांना निजसमाधीची रीत निरूपून, निरोप देऊन, कल्याण सोडून श्रीपर्वताकडे जात असताना गोरक्ष नावाच्या सिद्धाला पाहून, त्याच्याशी संभाषण करून, त्याच्या वज्रदेहाची तलवारीच्या घावाने पारख करून बोललेले वचन..."

प्रभुदेवांनी मोजक्या आणि नेमक्या शब्दांत एकाच वचनात 'योग' म्हणजे काय नव्हे : काय आहे हे सांगितले :

"नारुबेरिन कुटिलकुहकद कपटद योगवल्लदु निल्लिरो !
कायसमाधि करणसमाधि जीवसमाधि योगवल्लदु निल्लिरो !
निज सहजसमाधि गुहेश्वर"[१४]

"कंदमुळांचा कुटिल—कपटी योग नव्हे, सोड !
देहसमाधी इंद्रियसमाधी जीवसमाधी योग नव्हे, सोड !
निज सहजसमाधी : गुहेश्वर"

'शून्यसंपादने' मध्ये प्रभुदेव आणि गोरक्ष यांनी एकमेकांवर आघात करून पाहिले असा वृत्तांत नाही. फक्त प्रभुदेवांनी 'त्याच्या वज्रदेहावर असिलतेचा प्रहार करून परीक्षा पाहून' हा योग नव्हे असे सांगितल्याचे स्पष्ट होते.

परंतु 'प्रभुलिंगलीले'च्या आधारे 'लीलाविश्वंभर' मध्ये मात्र प्रभुदेवांनी आपल्या शरीरावर वार करण्याचे 'उठ उठ घे खड्ग,' असे गोरक्षाने आव्हान दिल्याचे वर्णन आहे.[१५] तसाच त्या वारांचा खणखणाटही झाला. परंतु प्रभुदेवांच्या शरीरावर खड्गलता फिरवायचा प्रयत्न करून खणखणाट बाजूलाच राहिला— 'देह'च सापडेना. 'नाडले शस्त्रघाता.'[१६]

प्रभुदेव— गोरक्षनाथ— अदंडीनाथ यांच्या संबंधीच्या या कथांतून ध्यानी येते ते हे: (१) प्रभुदेव— गोरखनाथ ही भेट आधीची आहे. त्यावेळी परीक्षा झालेला त्यांचा देह 'वज्रवोळि'चा होता. तर प्रभुदेवांचा 'अमरओळी'चा होता. (२) त्यानंतर

प्रभुदेवांच्या ‘ उपदेशा’ने गोरखनाथ ‘अमरओळी’चे झाले. (३) नंतर गोरक्षनाथ अंदडीनाथ भेटीत अदंडीच्या देहावरील घाव ‘ पाखाणीं खांडें लागे’ असे होते. खणखणाटही झाला असावा. पण गोरखनाथ मात्र अदंडीनाथाच्या प्रहारापुढे ‘अमरओळी’चे ठरले. (४) कारण मध्यंतरी त्यांचे प्रभुदेवांमुळे ‘ वज्रा’ ते ‘ अमर’ असे **परंपरा**– परिवर्तन झाले होते. (५) ‘ वोळी’ / ‘ ओळी’ याचा अर्थ ‘ परंपरा.’ ‘ वज्रओळी’ आणि ‘ अमरओळी ’ या दोन योग–परंपरा आहेत. (६) ‘ वज्र’यान पंथातील सिद्धांशी पहिली निगडित आहे: तर दुसरी ‘ अमर’ (नाथ) संप्रदायातील शैवांशी संबंधित आहे.

(७) “हे प्रथम वज्रवोळिचे : मग गोरक्षीनें अमर ओळी लाविले.” हा अदंडीनाथांसंबंधीचा चक्रधरांचा पुनरुच्चार [१७] ‘ओळीं’तील ‘ परंपरा’ हा अर्थ सुचवणारा आहे.

(८) ‘ अमर’ / ‘अमरनाथ’ म्हणजे ‘शिव’ : ‘ अमरओळी’ म्हणजे शिवापासून प्रारंभ झालेली ‘शैव’ परंपरा; खऱ्याखुऱ्या ‘ अमर ’त्वावर भर देणारी असे म्हणता येईल. तसेच अमरनाथ ही पुन्हा गोरखनाथांशी संबंधित व्यक्ती आहे : पण तिचे ऐतिहासिक अस्तित्व व. दा. कुलकर्णी यांना शंकास्पद वाटते : ‘ उपलब्ध पुराव्यावरून तरी अमरनाथ ही ऐतिहासिक व्यक्ती होती याला आधार सापडत नाही.”[१८]

(९) ‘विवेक–दर्पण’ (गोरख–अमरनाथ–संवाद) या ग्रंथनामावरून, प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी असणाऱ्या ‘ आमरनाथ ’ या उल्लेखावरून, ‘ अमरनाथ ’ या व्यक्तीचे अस्तित्व मानावेच लागते. प्रस्तुत ग्रंथास ‘ संवाद ’ म्हटले गेले तरी काटेकोर अर्थाने तो गुरु–शिष्य संवाद नव्हे.

(१०) ‘ श्री गोरक्षनाथवचनीं आमरनाथ कथयेंति’ याचा अर्थ ‘ अमरनाथांनी कथि(ये)ले ते गोरक्षनाथांच्या वचनांत ’ सांगितले गेले, असा का घेऊ नये ? ‘ श्रीगोरक्षविरचित अमरनाथसंवाद’ हे शीर्षक बरोबर आहे.[१९]

(११) अनिमिष (देव) ( = मत्स्येंद्र)–प्रभुदेव-गोरक्षनाथ हे ‘अमरओळी’चे स्वरूप मानणे : आपला गुरू(च) ‘ अमरनाथ ’ आहे असे मानणे, आणि त्याच्याशी झालेला संवाद म्हणजे ‘ विवेक–दर्पण ’ हे स्वीकारणे योग्य ठरेल. त्यांतील ‘ सीध लक्षणे ’ ‘ वज्र ’ आणि ‘ अमर ’ ‘ओळी ’वर प्रकाश टाकेल.[२०]

तात्पुरते तात्पर्य : ‘ वज्रओळी ’ आणि ‘ अमरओळी ’ या दोन योग-परंपरा होत.

मराठी विभाग
कर्नाटक विद्यापीठ
धारवाड.

**डॉ. पंडित आवळीकर**
**डॉ. विजया तेलंग**

**संदर्भ–**


१. लीळाचरित्र, (संपा.) वि. भि. कोलते, महाराष्ट्र राज्य साहित्यसंस्कृती मंडळ, मुंबई, १९७८, पूर्वार्ध १९८ आणि अज्ञात लीळा २८.

२. तत्रैव, पृष्ठे (अनुक्रमे) ९११ आणि ८४६.

३. वा. गो. आपटे, मराठी शब्दरत्नाकर, पुणे, १९२० पृ. ७६.

४. मोल्सवर्थकृत मराठी–इंग्रजी शब्दकोश, शुभदा–सारस्वत, पुणे, १९७५, पृ. १२२.

५. पूर्वोक्त, लीळाचरित्र, पूर्वार्ध १९८, पृ. १३८.

६. विवेक चिंतामणी, (संपा.) पंडित आवळीकर, कर्नाटक व पुणे विद्यापीठे, धारवाड– पुणे, १९६३, प्रस्तावना, पृ. ९४.

७. रा. चिं. ढेरे, चक्रपाणी, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९७७, पृ. १००

८. तत्रैव, तिसरा परिच्छेद.

९. (भविष्यत्पुराणांतर्गत) प्रभुलिंगलीला, वारद ग्रंथमाला, सोलापूर, भाग ३ रा, अ. १९, श्लो. ३३–११३. प्रस्तुत टीपही आवळीकरांच्या पूर्वोक्त प्रस्तावनेत आहे. टीप क्र. १५५.

१०. ब्रह्मदासकृत लीळाविश्वंभर, (संपा.) शं. धों. सार्दळ, अखिल भारत वीरशैवसंघ, बेळगाव, १९६४, अ. १९, पृ. ३१०–३२८.

११. SUNYASAMPADANE, Volume V, ( Ed. ) M. S. Sunkapur, Armando Menezes, Karnatak University, Dharwar, 1972, p. 384.

१२. तत्रैव, pp. 387–388.

१३. तत्रैव, p. 390.

१४. तत्रैव, p. 390

१५. पूर्वोक्त, लीळाविश्वभर, पृ. ३१७.

१६. तत्रैव, पृ. ३२०.

१७. पूर्वोक्त, लीळाचरित्र, अज्ञात लीळा २८, पृ. ७६०.

१८. व. दा. कुलकर्णी, नाथ परंपरेतील गद्य ग्रंथ : विवेक–दर्पण, मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक ६ वा, उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद, १९७१, पृ. १८.

१९. गो. का. चांदोरकर, 'श्रीगोरक्षविरचित अमरनाथ संवाद' वार्षिक इतिवृत्त, भा. इ. सं. मंडळ, पुणे, शके १८३७, पृ. ३२.

२०. पूर्वोक्त, विवेक–दर्पण, पृ. १२५. :

"सीध देह तैसा आछेद्य : आभेद्य : आजरामर : दगया : काया : वीवार्जित :"